खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

## क्रीडा विभाग, NSS, NCC

लोकमत

### राजगुरू महाविद्यालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात क्रीडा विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग प्रात्यक्षिकांचे आयोजन केले.

योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात योग प्रशिक्षक सागर गाडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

योगाभ्यासाचे महत्त्व सांगताना सागर गाडे म्हणाले की, योगामुळे ज्ञान व आरोग्य चांगले राहत असून, सर्वच वयोगटांतील व्यक्तींना योगसाधनेची गरज आहे. आपले मानसिक व शारीरिक आरोग्य चांगले राखण्यासाठी तसेच अनेक विकारांवर योगासने प्रभावी आहेत. त्यामुळे सर्वच व्यक्तींनी योगाभ्यास करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

Hello Pune Gramin
Page No. 5 Jun 22, 2025
Powered by: erelego.com

केसरी




# राजगुरू महाविद्यालयात योग प्रात्यक्षिकांचे आयोजन

**राजगुरूनगर,(वार्ताहर) :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टेपाटील महाविद्यालयात क्रीडा विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात योग प्रशिक्षक सागर गाडे यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

योगाभ्यासाचे महत्त्व सांगताना सागर गाडे म्हणाले, योगामुळे ज्ञान व आरोग्य चांगले राहत असून सर्वच वयोगटातील व्यक्तींना योगसाधनेची गरज आहे. आपले मानसिक व शारीरिक आरोग्य चांगले राखण्यासाठी तसेच अनेक विकारांवर योगासने प्रभावी आहेत. त्यामुळे सर्वच व्यक्तींनी योगाभ्यास करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांकडून त्यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ.प्रतिमा लोणारी, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा.योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे, प्रा. तानाजी पिंगळे यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी केले. प्रा. सारिका गोरे यांनी आभार मानले.

# राजगुरूनगर येथे योग प्रात्यक्षिकांचे आयोजन



**राजगुरूनगर : आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले.**

**राजगुरूनगर** : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात क्रीडा विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. योगा फॉर वन अर्थ, वन हेल्थ या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमात योग प्रशिक्षक सागर गाडे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजयशिंदे,सर्वप्राध्यापकवविद्यार्थी उपस्थित होते. योगाभ्यासाचे महत्त्व सांगताना गाडे म्हणाले की, योगामुळे ज्ञान व आरोग्य चांगले राहत असून सर्वच वयोगटातील व्यक्तींना योगसाधनेची गरज आहे. आपले मानसिक व शारीरिक आरोग्य चांगले राखण्यासाठी तसेच अनेक विकारांवर योगासने प्रभावी आहेत. त्यामुळे सर्वच व्यक्तींनी योगाभ्यास करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांकडून त्यांनी योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे, प्रा. तानाजी पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख